तात्पुरता **परवाना** : जिल्हा खाणकाम योजना तयार करण्यासाठी पुणे जिल्हयात जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यात आली असुन, सदर समिती अल्प मुदतीचे गौण खनिज परवाने हे जिल्हा खाणकाम योजनेनुसार देण्यात येत असल्याची खातरजमा करते.

सक्षम **अधिकारी** :

अ) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जलसंपदा विभाग यांच्या मालकीच्या जमिनीमधून फक्त त्यांच्या विभागाच्या वापरासाठी 25000 ब्रास पर्यंत.

ब) तहसिलदार यांचे अधिकारितेच्या हद्दीतील जमिनीतुन 500 ब्रास पर्यंत

क) उपविभागीय अधिकारी यांचे अधिकारितेच्या हद्दीतील जमिनीतुन 2000 ब्रास पर्यंत.

ड) जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांचे जिल्हयाच्या हद्दीतील जमिनीतुन 25000 ब्रास पर्यंत

तात्पूरता खाणपरवानासाठी विहित नमूना अर्ज सोबत जोडणेत आला असून परिपूर्ण आवश्यक कागदपत्रासह अर्ज सक्षम अधिका-यास प्राप्त झाल्यास, अर्ज मिळाल्यापासून 30 दिवसाच्या कालावधीत, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे परवाना देईल किंवा त्यास नकार देईल.

**नमुना - त** दिनांक:- / /201

**(नियम 61 (1) पहा)**

**खाण परवाण्यासाठी अर्ज**

रु. 20/- किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटवावा

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी . पुणे**
**(खनिकर्म शाखा)**

विषय:- **<u>तात्पुरता खाण परवान्यासाठी अर्ज</u>**

महोदय,

मी / आम्ही अशी विनंती करतो की, महराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास आणि विनियमन) नियम, 2013 अन्वये मला / आम्हाला तात्पुरता खाणपट्टा मंजुर करण्यात यावा.

| अ.क्र. | तपशिल | पुर्तता |
|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे पुर्ण नांव | |
| 2 | अर्जदाराचा स्थानिक व कायमस्वरुपी पुर्ण पत्ता (अनिवार्य) | |
| 3 | दुरध्वनी क्र. / मोबाईल क्र. (अनिवार्य) | |
| 4 | ई मेल आयडी (अनिवार्य) | |
| 5 | अर्जदाराचा व्यवसाय किंवा व्यवसायाचे स्वरुप | |
| 6 | राष्ट्रीयत्व | **भारतीय** |
| 7 | अ) खाण पट्टया मागणी केलेल्या गावाचे नांव | |
| | ब) खाण पट्टया मागणी केलेल्या तालुक्याचे नांव | |
| | क) खाण पट्टया मागणी केलेल्या जमिनीचा स.नं./ग.नं. | |
| | ड) खाण पट्टया मागणी केलेल्या जमिनीचे क्षेत्र (हे. आर) | |
| 8 | मागणी केलेले परिमाण (ब्रास / टन) | |
| 9 | खाणकाम करावयाच्या गौण खनिजाचे नांव | |
| 10 | गौण खनिज उत्खनन करणेचे प्रयोजन | |
| 11 | अर्जदाराचा दर्जा - अर्जदार खाजगी व्यक्ती / खाजगी कंपनी असेल तर नोंदणीचे ठिकाण, नोंदणी क्रमांक व दिनांक, सर्व सदस्यांचे राष्ट्रीयत्व (कागदपत्रांची साक्षांकित प्रत जोडावी) | |

| | | |
|---|---|---|
| 12 | भागीदार संस्था किंवा संघ असल्यास भागीदार संस्थेच्या सर्व भागीदारांचे किंवा संघाच्या सदस्यांचे राष्ट्रीयत्व (कागदपत्रांची साक्षांकित प्रत जोडावी) | |
| 13 | गौण खनिज वाहतुकीसाठी / उत्खननासाठी वापरणेच्या वाहनांचा तपशिल. | |
| 14 | वाहनांची क्षमता व प्रति वाहनांच्या होणाऱ्या खेपांचा तपशिल | |
| 15 | वाहनातुन दररोज किती ब्रास वाहतुक होईल याचा तपशिल | |
| 16 | वाहतुकीसाठी / उत्खननासाठी लागणारा कालावधीचा तपशिल | |
| 17 | खाणपट्टा मागणी कालावधी | |

**<u>सोबत खालील प्रमाणे सहपत्र सादर करीत आहे.</u>**

१. अर्ज फी रक्कम रुपये 5000/- चे ग्रास प्रणाली व्दारे शासन जमा केलेले चलन.
२. तीन महीने अलीकडील गट नं. चे 7/12 उतारा व 8 अ चा खातेउतारा (प्रमाणित सत्य प्रत)
३. मागणी क्षेत्राचा तपशिल देणारा सीमारेषा आणि ज्या संबंधात खाणकाम भाडेपट्टा आवश्यक आहे अशी जागा, सीमारेषा आणि क्षेत्र तितक्या अचुकतेने दर्शविणारा नकाशा किंवा आराखडा.
४. संबंधित जमिन मालकाचे विहीत नमुन्यातील 100/- रुपये किंमतीचे स्टँम्प पेपरवर संमतीपत्र.
५. अर्जदाराचे उत्खनन करावयाचे क्षेत्र व मोजमापाबाबत विहीत नमुन्यातील 100/- रुपये किंमतीचे स्टँम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र.
६. प्रश्नाधिन क्षेत्राच्या मंजुर बांधकाम नकाशाची प्रमाणित सत्यप्रत
७. प्रश्नाधिन क्षेत्रास सक्षम अधिकाऱ्याची अकृषिक परवानगी घेतली असल्यास आदेशाची प्रत.
८. नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभागाकडील झोन दाखला
९. खोदाई करणेच्या क्षेत्रातुन काढणेच्या गौण खनिजाबाबत वास्तुविशारद यांचे प्रमाणपत्र.
१०. गौण खनिज वाहतुकीसाठी / उत्खननासाठी वापरणेच्या वाहनांचा तपशिल.

मी / आम्ही घोषित करतो की, वर दिलेला तपशिल अचुक आहे. आणि मी / आम्ही उत्खनन करावयासाठी प्रस्तावित असलेल्या खनिजाच्या परिमाणावर निर्धारित करण्यात येईल. त्यानुसार इतर कोणताही तपशिल सादर करण्यास तयार आहे / आहोत. माझ्याकडे / आमच्याकडे मागणी करण्यात येईल. असे कोणतेही भाडे किंवा उपकर आणि इतर कोणतेही खनिज देय रक्कम आगाऊ प्रदान करावयाचे देखील मी / आम्ही मान्य करतो.

**(टिप:- उपरोक्त नमुद कागदपत्रे अपुर्ण असतील तर सदरचा अर्ज निकाली काढणेत येईल याची नोंद घ्यावी.)**

आपला विश्वासु

**ठिकाण:-** (अर्जदाराची **स्वाक्षरी)**

**दिनांक:-** / /201